दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 — बुधवार, दि. २७ मे, २०२६ — वर्ष - ९ ■ अंक - २४१ ■ पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

बुधवार, दि. २७ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, एकादशी सकाळी ६-२२ पर्यंत नंतर द्वादशी तिथी, दिवस नक्षत्र– चित्रा अहोरात्र,
चंद्र रास - कन्या संध्याकाळी ७ पर्यंत नंतर तुला,
सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन

### अण्णा द्रमुकला धक्का

**चेन्नई** : अण्णा द्रमुक पक्षातील वाद आता समोर येऊ लागले असून, पक्षाच्या तीन आमदारांनी सोमवारी विधानसभा अध्यक्षांकडे राजीनामे सादर केले. मरगथम कुमारवेल, सत्यभामा आणि जयकुमार या आमदारांनी तामिळनाडू सचिवालयात विधानसभा अध्यक्ष जेसीडी प्रभाकरन यांची भेट घेऊन राजीनामे दिले. या तिन्ही आमदारांनी तामिळनाडूचे मंत्री आणि टीव्हीके पक्षाचे नेते आधाव अर्जुन यांची भेट घेतल्याने त्यांच्या टीव्हीकेमध्ये प्रवेशाच्या चर्चांना वेग आला आहे.

## सारांश वृत्त

### निधीचा गैरवापर; अधिकाऱ्यांना अटक

**गुवाहाटी** : आसाम नागरी सेवा (एसीएस) संवर्गातील दोन अधिकाऱ्यांसह किमान आठ सरकारी अधिकाऱ्यांना आर्थिक अनियमिततेप्रकरणी अटक करण्यात आली आहे, अशी माहिती दक्षता विभागाने मंगळवारी दिली. दक्षता आणि लाचलुचपत प्रतिबंधक संचालनालयाने (डीव्हीएसी) एका निवेदनात म्हटले आहे की, २०२३ मध्ये दाखल झालेल्या प्रकरणाच्या संदर्भात शोध मोहीम राबविली.

### इंधन दरवाढीविरोधात काँग्रेसचा मोर्चा

**रांची** : इंधनाच्या दरवाढीविरोधात काँग्रेसच्या झारखंड शाखेने मंगळवारी निषेध मोर्चा काढला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष केशव महतो कमलेश आणि इतर नेत्यांनी कॉंग्रेस भवनातून ही मिरवणूक काढली आणि ती शहीद चौक आणि अल्बर्ट एक्का चौकातून लालपूर पेट्रोल पंपावर पोहोचली, जिथे त्यांनी इंधनाच्या किंमती कमी करण्याच्या मागणीसाठी औपचारिकपणे स्वाक्षरी मोहीम सुरू केली. या मिरवणुकीत शेकडो काँग्रेस कार्यकर्ते सहभागी झाले होते. त्यांनी फलक घेऊन केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

### कर्नाटकात १८ जून रोजी मतदान

**बेंगळूर** : कर्नाटक विधान परिषदेच्या आमदारांच्या कोट्यातील सात जागांसाठी १८ जून रोजी निवडणूक होणार आहे. आमदारांनी निवडून दिलेल्या सात एमएलसींचा कार्यकाळ ३० जून रोजी संपणार आहे. काँग्रेस सदस्य गोविंदा राजू, नसीर अहमद, तिप्पनप्पा, बी. के. हरिप्रसाद, भाजपचे सदस्य एन. नागराजू (एमटीबी), प्रताप सिम्हा नायक के आणि सुनील वल्ल्यापूर हे निवृत्त होत आहेत.

### 'सरकारी योजनांच्या' गर्दीत सामान्यांचा आक्रोश हरवला?

# तेल कंपन्यांना 77 हजार कोटींचा नफा, जनता बेहाल!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई/बीड** : देशभरात एका बाजूला प्रमुख तेल कंपन्यांनी तब्बल ७७ हजार कोटी रुपयांचा बंपर नफा कमावला असताना, दुसऱ्या बाजूला सर्वसामान्य जनतेच्या खिशाला मात्र सलग चौथ्यांदा इंधन दरवाढीची मोठी कात्री लागली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चे तेल स्वस्त होत असताना देशात मात्र पेट्रोल-डिझेलचे दर गगनाला भिडत आहेत. मात्र, या गंभीर आर्थिक फटक्याकडे जनतेचे फारसे लक्ष जाऊ नये, यासाठी शासकीय योजनांचा 'सुरेल' पडदा पुढे करण्यात आल्याची चर्चा आता राजकीय आणि आर्थिक वर्तुळात रंगू लागली आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, शेतकरी सन्मान निधी आणि मोफत अन्नधान्य वितरण यांसारख्या थेट लाभ देणाऱ्या योजनांमुळे सर्वसामान्य नागरिक सध्या या दरवाढीकडे काहीसे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. चालू आर्थिक वर्षात देशातील अग्रगण्य तेल कंपन्यांच्या नफ्यात विक्रमी वाढ झाली आहे. तब्बल ७७ हजार कोटींचा नफा पदरात पाडून घेतल्यानंतरही या कंपन्यांनी ग्राहकांना दिलासा देण्याऐवजी लागोपाठ चौथ्यांदा दरवाढ केली आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे वाहतूक खर्च वाढून पर्यायाने भाजीपाला, दूध आणि दैनंदिन गरजेच्या वस्तू महाग होत आहेत. असे असतानाही, या दरवाढीविरोधात पूर्वीसारखा तीव्र लोकक्षोभ किंवा आंदोलने रस्त्यावर दिसत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

या शांततेमागे सरकारची 'कल्याणकारी योजनांची' खेळी अत्यंत प्रभावी ठरल्याचे बोलले जात आहे. लाडकी बहीण योजना: राज्यातील लाखो महिलांच्या बँक खात्यात दरमहा थेट पैसे जमा होत असल्याने कुटुंबांना तात्कालिक आर्थिक आधार मिळाला आहे. शेतकरी सन्मान योजना: शेतकऱ्यांना वर्षाकाठी मिळणाऱ्या ठराविक निधीमुळे ग्रामीण भागातील रोष काहीसा शांत झाला आहे.

मोफत अन्नधान्य: गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना मोफत रेशन मिळत असल्याने खाद्यान्नाचा खर्च वाचला आहे.

तज्ज्ञांच्या मते, थेट लाभ हस्तांतरण योजनांमुळे जनतेला तात्काळ पदरात काहीतरी पडल्याचे समाधान मिळते. मात्र, इंधन दरवाढीमुळे होणारे 'अदृश्य' नुकसान लोकांच्या चटकन लक्षात येत नाही. तेल कंपन्यांचा ७७ हजार कोटींचा नफा हा थेट जनतेच्या खिशातील पैसा आहे. परंतु, मोफत अन्नधान्य आणि सन्मान निधीच्या गदारोळात हा मुख्य मुद्दा मुख्य प्रवाहातून बाजूला सारण्यात सरकारला यश आले आहे, असेच सध्याचे चित्र आहे. कारण एका हाताने द्यायचे आणि दुसऱ्या हाताने घ्यायचे अशीच सिस्टीम शासनाने राबवल्याचे दिसून येत आहे कारण या गोंडस योजना सुरू केल्यामुळे ग्रहणींना पंधराशे रुपये लाडक्या बहिणीचे मिळतात शेतकऱ्यांना केंद्राचे आणि राज्याचे असे मिळून चार हजार रुपये सन्मान योजना मिळते स्वस्त धान्य दुकानावर मोफत अन्नधान्य मिळते त्यामुळे या महागाई कडे फारसे लक्ष जात नसल्याचे एका पाहणीतून दिसून येते तेल कंपन्यांचा नफा: ₹७७,००० कोटी तरी सलग ४ थ्यांदा इंधन दरवाढ लक्ष विचलित करणारे घटक पाहिले त्यात लाडकी बहीण, शेतकरी सन्मान, मोफत रेशन. आता प्रश्न असा उपस्थित होतो की, निवडणुकीच्या तोंडावर सुरू असलेल्या या 'पॉप्युलिस्ट' (लोकप्रिय) योजनांचा प्रभाव इंधन दरवाढीच्या चटक्यांपेक्षा मोठा ठरणार का? की येत्या काळात हा सुप्त असंतोष निवडणुकीच्या माध्यमातून बाहेर पडणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> एका हाताने द्यायचे आणि दुसऱ्या हाताने काढून घ्यायचे, अशी ही अवस्था आहे. सरकारने लाडक्या बहिणींना पैसे दिले खरे, पण डिझेल-पेट्रोल महाग करून घरातील गॅस, किराणा आणि वाहतूक इतकी महाग केली की, मिळालेले पैसे कुठे गेले हे कळतच नाही."
>
> — **मनीषा जाधव,** गृहिणी,

## शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांना मुदतवाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : देशात सुरू असलेल्या जनगणना २०२७ प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या निर्णयाला मंजुरी देण्यात आली.

मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, आता शासनाला ३० जून २०२६ पर्यंत बदली प्रक्रिया राबविता येणार आहे. यासाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे नियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मध्ये सुधारणा करण्यात येणार असून, त्यासंदर्भातील मसुद्यासही मंजुरी देण्यात आली आहे.

दरवर्षी एप्रिल आणि मे महिन्यात शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या केल्या जातात. मात्र, देशात जनगणना २०२७ अंतर्गत पहिला टप्पा सुरू आहे. या टप्प्यात घरयादी तयार करणे आणि घरगणना ही प्रक्रिया १६ मे ते १४ जून या कालावधीत राबविण्यात येत आहे. या कामासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांच्या बदल्या करू नयेत, असे स्पष्ट निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. त्यामुळे जनगणनेत अडथळा निर्माण होऊ नये आणि सातत्य कायम राहावे, यासाठी राज्य सरकारने बदल्यांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

### इंधन टंचाईवर मुख्यमंत्र्यांचा इशारा

## पेट्रोल-डिझेल साठेबाजीवर कारवाई होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : इराण-अमेरिका संघर्ष आणि होर्मूझ सामुद्रधुनीतील तणावामुळे देशभरात निर्माण झालेल्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील परिस्थितीबाबत स्पष्टीकरण दिले आहे. महाराष्ट्रात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असूनही भीतीपोटी वाढलेल्या मागणीमुळे तुटवड्यासदृश परिस्थिती निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांत पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसत आहे. अनेक ठिकाणी नो स्टॉकचे फलक झळकले असून, इंधनासाठी नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे. काही ठिकाणी यावरून वादावादी आणि तणावाच्या घटनाही घडल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात सरासरीपेक्षा २३ टक्के अधिक पेट्रोल पुरवठा केला जात आहे. मात्र डिझेलची मागणी तब्बल ५२ टक्क्यांनी वाढली आहे. अकोल्यात तर डिझेलची मागणी १५४ टक्क्यांनी वाढली आहे, तर इतर अनेक जिल्ह्यांत ७० टक्क्यांहून अधिक खपत वाढली आहे, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले की, पेट्रोल आणि डिझेल टंचाई संदर्भात चर्चा सुरू आहे. सरासरीपेक्षा मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे आणि त्याची पूर्तता आम्ही करत आहोत. मात्र काही ठिकाणी साठेबाजी होत असल्याचे दिसून येत आहे. पुरवठा विभाग आणि गृह विभाग संयुक्त कारवाई करणार आहेत. शेतकऱ्यांना डिझेलचा पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांसाठी असलेल्या डिझेलचा काही ठिकाणी गैरवापर होत आहे का, कमर्शियल वापरासाठी सामान्य कोट्यातील डिझेल वळवले जात आहे का, याचा तपास सुरू आहे, असे फडणवीस म्हणाले.

दरम्यान, राज्यातील अनेक भागांत खरीप हंगामाच्या तोंडावर डिझेल टंचाई निर्माण झाल्याने शेतकरी वर्ग चिंतेत आहे. ट्रॅक्टर, पंपसेट आणि शेती मशागतीसाठी डिझेलची गरज वाढली असताना काही जिल्ह्यांत प्रशासनाने वितरणावर निर्बंधही आणले आहेत.

याचवेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी कांद्याच्या प्रश्नावरही भाष्य केले. केंद्र सरकारने कांद्याच्या दरात साडेतीन रुपयांची वाढ करून प्रति किलो १५ रुपयांचा दर दिल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र सरकार बाजारात मध्यस्थी करत आहे. मोठ्या प्रमाणावर खरेदी सुरू आहे. राज्य सरकार कांदा उत्पादकांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील आहे. मात्र काही जण या विषयावर राजकारण करत आहेत, अशी टीकाही त्यांनी केली.

पश्चिम आशियातील तणाव, होर्मूझ सामुद्रधुनीतील अडथळे आणि वाढलेली भीती यामुळे राज्यात निर्माण झालेली परिस्थिती तात्पुरती असल्याचा दावा शासनाकडून करण्यात येत असला, तरी इंधन पुरवठा पूर्णपणे सुरळीत कधी होणार याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

### वारंवार दरवाढ झाल्यास भाडेवाढ अटळ

## डिझेल दरवाढीचा एसटीला बसणार फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : गेल्या दहा दिवसांत डिझेलच्या दरात चार वेळा वाढ झाल्याने राज्य परिवहन महामंडळाच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे. डिझेलच्या किमती प्रति लिटर सात ते आठ रुपयांनी वाढल्याचा थेट परिणाम एसटी महामंडळाच्या उत्पन्नावर होत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. तसेच, सध्या एसटीच्या तिकीट दरवाढीचा कोणताही प्रस्ताव नसला तरी डिझेलचे दर सातत्याने वाढत राहिल्यास भविष्यात भाडेवाढ टाळणे कठीण होईल, असे संकेत त्यांनी दिले.

सर्वसामान्य प्रवाशांना परवडणारी सेवा देणे हेच एसटी महामंडळाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे सरनाईक यांनी स्पष्ट केले. मात्र, तेल कंपन्यांकडून वारंवार होणारी दरवाढ आणि पुरवठ्यातील तुटवडा यामुळे महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर ताण वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, इंधन खर्च कमी करण्यासाठी एसटी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. राज्यातील सर्व आगारांना दररोज किमान पाच लिटर डिझेल बचतीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. केवळ पाच लिटर डिझेलची बचत झाली तरी महामंडळाची लाखो रुपयांची बचत होऊ शकते, असे सरनाईक म्हणाले. डिझेल बचतीसाठी सर्व बसांची तांत्रिक तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, सर्वाधिक इंधन बचत करणाऱ्या चालकांचा विशेष सत्कार करण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

एसटी महामंडळाचा दैनंदिन कारभार सुरळीत ठेवण्यासाठी दररोज सुमारे १० लाख ८७ हजार लिटर डिझेलची आवश्यकता भासते. राज्यातील सुमारे ५५ लाख प्रवाशांचा रोजचा प्रवास कोणत्याही अडथळ्याविना सुरू राहावा, यासाठी डिझेल पुरवठा खंडित होऊ नये याकडे प्रशासनाचे विशेष लक्ष असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. यासंदर्भात हिंदुस्तान पेट्रोलियम, इंडियन ऑईल, नायरा आणि रिलायन्स या इंधन पुरवठादार कंपन्यांच्या अधिकाऱ्यांसोबत एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची सविस्तर चर्चा झाल्याची माहितीही त्यांनी दिली.

### केंद्र सरकारकडून नवे आधार अ‍ॅप लाँच

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने जुने एम-आधार अ‍ॅप लवकरच बंद करण्यात येणार असल्याची घोषणा केली असून त्याऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने अधिक सुरक्षित आणि अत्याधुनिक सुविधांनी युक्त नवे आधार अ‍ॅप सादर केले आहे. नागरिकांचा वैयक्तिक डेटा अधिक सुरक्षित ठेवणे आणि डिजिटल पडताळणी प्रक्रिया अधिक सोपी करणे हा या नव्या अ‍ॅपमागील मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे. यूआयडीएआयने आपल्या अधिकृत एक्स खात्यावरून याबाबत माहिती दिली. एम-आधार अ‍ॅप बंद होणार असून नागरिकांनी नवीन आधार अ‍ॅप डाउनलोड करून घ्यावे, असे म्हटले आहे.

## ठाकूरांची बविआ शिंदे सेनेत विलिन?

### एकनाथ शिंदे धक्का देण्याच्या तयारीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वसई** : विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात हालचालींना वेग आला असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुन्हा एकदा मोठे धक्कातंत्र वापरण्याच्या तयारीत असल्याची चर्चा रंगली आहे. बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाच्या विलीनीकरणानंतर आता वसई-पालघर पट्ट्यात प्रभाव असलेल्या बहुजन विकास आघाडीच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे.

माध्यमांशी बोलताना ठाकूर म्हणाले की, माझ्यासोबत राष्ट्रवादी, कम्युनिस्ट आणि बहुजन विकास आघाडीची मते आहेत. त्यामुळे या निवडणुकीत आम्ही किंगमेकर ठरणार आहोत. पक्ष विलीनीकरणाच्या चर्चेबाबत त्यांनी सूचक प्रतिक्रिया देताना घोडा मैदान समोर आहे, आमची चर्चा सुरू आहे, असे म्हटले. विधान परिषद निवडणुकीसाठी बहुजन विकास आघाडीच्या गोटाकडे सुमारे ७१ मतांचे संख्याबळ असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या मतांची भूमिका निवडणुकीच्या निकालात निर्णायक ठरू शकते.

स्वतः निवडणूक लढवणार का, या प्रश्नावर हितेंद्र ठाकूर यांनी मी आमदार होणार नाही, असे स्पष्ट केले. मात्र मुलगा क्षितिज ठाकूर यांच्या राजकीय भवितव्याबाबत बोलताना कोणताही बाप मुलाच्या पाठीशी उभा असतो, असे सांगत त्यांनी मुलाला पूर्ण पाठबळ असल्याचे स्पष्ट केले.

वसई-पालघर पट्ट्यातील बहुजन विकास आघाडीची पकड लक्षात घेता, आगामी काळात महायुतीतील समीकरणांवर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. विधानपरिषद निवडणुकीतील राजकीय समीकरणे त्यामुळे बदलण्याची शक्यता आहे.

### विदर्भात उष्णतेचा कहर, २८ मेनंतर वादळी पावसाची शक्यता

## केरळमधील मान्सूनचे आगमन लांबणीवर गेले...

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : केरळमध्ये मान्सूनचे आगमन अपेक्षेपेक्षा लांबल्याने देशभरातील हवामान हालचालींकडे लक्ष लागले असतानाच महाराष्ट्रात उष्णतेची तीव्र लाट कायम आहे. विशेषतः विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाचा पारा ४५ ते ४७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे.
हवामान विभागाने विदर्भातील काही भागांसाठी रेड अलर्ट जारी केला असून २८ मेनंतर वादळी पावसाची शक्यता वर्तवली आहे.
मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकणातील तापमानात मात्र तुलनेने घट झाली आहे. पुण्यात गेल्या काही दिवसांत तापमान ४० अंशांच्या खाली आले असून सध्या ३७ ते ३८ अंश सेल्सिअसदरम्यान नोंद होत आहे. काही भागांमध्ये तापमान ३५ ते ३६ अंशांपर्यंत खाली आल्याने पुणेकरांना उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला आहे.
राज्यात आता मान्सूनच्या आगमनाची उत्सुकता वाढली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार यंदा देशात सरासरीच्या सुमारे ९२ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. मात्र एल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनच्या गतीवर आणि पावसाच्या स्वरूपावर परिणाम होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.
हवामान तज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार मान्सूनने अंदमान-निकोबार बेटांचा परिसर पूर्णपणे व्यापला असून तो अरबी समुद्राच्या काही भागांपर्यंत पोहोचला आहे. सुरुवातीला २६ मे रोजी केरळमध्ये मान्सून दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. मात्र बदलत्या हवामान परिस्थितीमुळे त्याच्या प्रगतीला विलंब होत असून आता ३० मेपर्यंत परिस्थिती अनुकूल राहिल्यास केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याची घोषणा होऊ शकते. केरळमध्ये मान्सून वेळेआधी दाखल झाल्याच्या चर्चांना हवामान विभागाने अधिकृत दुजोरा दिलेला नाही.
अधिकाऱ्यांच्या मते, मान्सून अंदमानमध्ये वेळेपूर्वी पोहोचला असला तरी त्यानंतर त्याची प्रगती मंदावली असून तो सध्या स्थिरावलेला आहे.
हवामान विभागाने स्पष्ट केले की केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याचे घोषित करण्यासाठी काही महत्त्वाचे निकष पूर्ण होणे आवश्यक असते. केरळमधील निश्चित १४ केंद्रांवर आवश्यक प्रमाणात पाऊस पडणे आणि मान्सूनचे वारे ३ ते ५ किलोमीटर उंचीपर्यंत सक्रिय असणे गरजेचे असते. सध्या वाऱ्यांची स्थिती अनुकूल असली तरी अरबी समुद्रातील चक्राकार वाऱ्यांमुळे मान्सूनच्या मार्गात काहीसा अडथळा निर्माण झाला आहे.
विदर्भात मात्र उष्णतेची लाट कायम असल्याने नागरिकांना पुढील काही दिवस सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उष्माघाताचा धोका लक्षात घेता दुपारच्या वेळेत अनावश्यक बाहेर पडणे टाळावे, पुरेसे पाणी प्यावे आणि आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## सावंतवाडी रेल्वे स्थानकाच्या नामांतरास मंजुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंगळवारी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सावंतवाडी रेल्वे स्थानकाच्या नामांतरापासून ते नागपूर बाह्य वळण रस्त्यासाठीच्या जमिनीवरील मुद्रांक शुल्क माफीपर्यंत विविध विषयांवर मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब केले.

बैठकीतील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे सावंतवाडी रेल्वे स्थानकाला कोकण रेल्वेचे शिल्पकार आणि ज्येष्ठ समाजवादी नेते स्वर्गीय मधु दंडवते यांचे नाव देण्याचा. मंत्रिमंडळाने सावंतवाडी रेल्वे स्थानकाचे नामकरण ‘लोकमान्य मधु दंडवते रेल्वे टर्मिनस’ असे करण्यास मंजुरी दिली. कोकणातील जनतेची अनेक वर्षांपासूनची मागणी यामुळे पूर्ण झाली असून, यासंदर्भातील प्रस्ताव आता केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

उद्योग विभागाशी संबंधित निर्णयामध्ये डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील मौजे सागाव सोनारपाडा (ता. कल्याण, जि. ठाणे) येथील पिंपळेश्वर देवस्थान मंदिर ट्रस्टला जमीन देण्यास मंजुरी देण्यात आली. महसूल व मुद्रांक शुल्क विभागांतर्गत नागपूरमधील नवीन बाह्य वळण रस्ता प्रकल्पासाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. मौजे गोदणी आणि मौजे लाडगाव (रीठी) येथील खाजगी जमीन थेट खरेदी करताना लागणारे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क माफ करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. या निर्णयामुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती मिळणार असल्याचे सांगितले जात आहे.

# तामिळनाडूत नव्याने लिहिलेली समीकरणे

» तामिळनाडूच्या राजकीय पटलावर अभिनेते सी. जोसेफ विजय यांनी मिळवलेल्या अभूतपूर्व सत्तेनंतर अवघ्या दोन आठवड्यांतच राज्याची पन्नास वर्षांची पारंपरिक समीकरणे पूर्णपणे कोलमडली असल्याचे दिसून येते.



तामिळनाडूच्या राजकारणात चित्रपट जगतातून थेट सत्तेच्या शिखरावर पोहोचण्याची परंपरा जुनी असली, तरी अभिनेते सी. जोसेफ विजय यांच्या तामिळनाडू वेत्री कळघम या पक्षाने सत्तेवर येताच राजकीय पटलावर घडवून आणलेला बदल थक्क करणारा आहे. विजय यांच्या सरकारला सत्तेवर यायच्या आधीपासूनच जनमानसात मोठी उत्सुकता होती, परंतु सत्तेवर येऊन जेमतेम दोन आठवडे झाले आहेत, तोच त्यांनी राज्यातील दोन दशके जुनी द्रमुक आघाडी मोडीत काढली आहे. पन्नास वर्षांहून अधिक काळ राज्याच्या सत्तेचे केंद्र राहिलेला अण्णा द्रमुक पक्ष विधानसभेत विश्वासदर्शक ठरावावरून विखुरला गेला आहे. या सर्व राजकीय धुमश्चक्रीमध्ये भारतीय जनता पक्ष आणि त्यांचे मित्रपक्ष सध्या योग्य संधीची वाट पाहत शांत बसले आहेत. द्रमुकचे जुने मित्रपक्ष वेगाने विजय यांच्या नव्या पक्षाकडे झुकू लागल्याने एम. के. स्टॅलिन यांच्या पाठीशी एकाकीपणा उरला आहे. हा अनपेक्षित पराभव आणि त्यानंतर निर्माण झालेली परिस्थिती द्रमुकच्या नेतृत्वाला प्रचंड अस्वस्थ करणारी आहे.

या बदलत्या समीकरणात सर्वांत मोठी आणि वेगवान हालचाल काँग्रेस पक्षाने केली आहे. पराभवाचे चटके बसताच द्रमुकची साथ सोडणारा काँग्रेस हा तामिळनाडूतील पहिला पक्ष ठरला. राज्यातील निवडणुकीचे निकाल विजय यांच्या बाजूने लागताच, काँग्रेसच्या तरुण नेत्यांनी हायकमांडला वस्तुस्थितीची जाणीव करून दिली आणि टीव्हीके आघाडीत सामील होऊन मंत्रिमंडळाचा भाग बनण्यास भाग पाडले. काँग्रेसने स्वतःपुरता निर्णय घेतला नाही, तर कम्युनिस्ट पक्ष आणि मुस्लिम लीगच्या राज्य घटकांनाही विजय यांच्या गोटात आणण्यासाठी दिल्ली आणि केरळमधील आपल्या सर्वोच्च नेत्यांमार्फत मोठा दबाव आणला. या चक्रव्यूहामुळे राज्यातील एकमेव दलित पक्ष असलेल्या व्हीसीकेकडे विजय यांच्याशी हातमिळवणी करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरला नाही. या राजकीय कौशल्यामुळे काँग्रेस, व्हीसीके आणि मुस्लिम लीग या तिन्ही पक्षांना विजय यांच्या मंत्रिमंडळात मानाचे स्थान मिळाले आहे. तामिळनाडूच्या इतिहासात द्रमुक किंवा अण्णा द्रमुक या दोन्ही प्रमुख पक्षांनी आजवर कधीही आपल्या आघाडीतील भागीदारांना मंत्रिमंडळात वाटा दिला नव्हता, हा इतिहास पाहता विजय यांनी टाकलेले हे पाऊल अत्यंत क्रांतिकारी ठरले आहे.

या मोठ्या पडझडीनंतर आता वायको यांच्या नेतृत्वाखालील एमडीएमके पक्षदेखील द्रमुक आघाडीतून बाहेर पडण्याच्या विचारात आहे. सध्याच्या घडीला स्टॅलिन यांच्यासोबत उरलेला एकमेव महत्त्वाचा मित्रपक्ष म्हणजे दिवंगत विजयकांत यांच्या पत्नी प्रेमलथा यांच्या नेतृत्वाखालील डीएमडीके हाच आहे. राजकीय तज्ज्ञांच्या मते, द्रमुकवर आलेला हा एकाकीपणा नवीन नाही. एकोणीसशे एक्क्याण्णव मध्ये राजीव गांधींच्या हत्येनंतर, तसेच २०११ आणि २०१६ मध्येही पक्षाला अशाच कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागले होते. परंतु, एका पूर्णपणे नवीन चेहऱ्याकडून झालेल्या या पराभवामुळे यंदा पक्षाची पाळेमुळे हादरली आहेत. दुसरीकडे, ई. पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखालील अण्णा द्रमुक पक्षातील अंतर्गत बंडखोरी समोर आली आहे. पक्षाचे बंडखोर नेते एस. पी. वेलुमणी आणि के. सी. वीरमणी यांनी पुन्हा पक्षात परतण्याचा निर्णय घेतला आहे, कारण विजय यांनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात घेण्यास स्पष्ट नकार दिला होता. हे बंडखोर नेते भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये आरोपी असल्याने, विजय यांना सुरुवातीलाच कोणतीही राजकीय जोखीम पत्करायची नव्हती.

या सर्व अस्थिरतेचा गैरफायदा न घेता केंद्रीय पातळीवरील सत्ताधारी भाजपने शांत राहून परिस्थिती न्याहाळण्याचे धोरण ठेवले आहे. या राजकीय गोंधळाचा फायदा घेत विजय यांनी मात्र प्रशासनावरील आपली पकड मजबूत करण्यास सुरुवात केली आहे. एका गंभीर गुन्ह्याचा तपास पोलिसांनी चोवीस तासांच्या आत पूर्ण करून नवीन प्रशासनाचा वचक दाखवून दिला आहे, तसेच राज्यात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी विजय यांनी मोठ्या उद्योगपतींशी बैठकांचे सत्र सुरू केले आहे. दरम्यान, अंमलबजावणी संचालनालयाने माजी मंत्र्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी राज्य सरकारकडे परवानगी मागितली असून, १२० दिवसांच्या आत निर्णय न झाल्यास परवानगी गृहीत धरली जाईल, या नियमाने विजय यांच्यासमोर मोठे धर्मसंकट उभे केले आहे. विजय यांना आता सत्तेवर आल्यानंतर आपल्या शब्दाला जागून दाखवावे लागेल. राजकारणातील ही नवी इनिंग लोकप्रियतेच्या बळावर चालणार नाही, तर प्रशासकीय पारदर्शकता आणि नैतिकतेच्या कसोटीवरच विजय यांच्या भविष्यातील यशाचे गणित अवलंबून असणार आहे, हाच या घडामोडींचा मुख्य संदेश आहे.

## संपादकीय

# राजनैतिक कसरत आणि ऊर्जा हितसंबंध



**अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांचा पहिला नवी दिल्ली दौरा अशा वेळी होत आहे, जेव्हा होर्मुज सामुद्रधुनीतील संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा विस्कळीत झाला आहे. अशा वादळी पार्श्वभूमीवर, भारताने स्वतःचे आर्थिक हितसंबंध सुरक्षित ठेवत वॉशिंग्टनसोबतच्या संबंधांमध्ये समतोल राखणे हे भारतीय परराष्ट्र धोरणासमोरील सर्वांत मोठे आव्हान ठरणार आहे.**

जागतिक पातळीवर होर्मुज जलमार्गातील संकटामुळे खनिज तेलाच्या किमती भडकत असताना आणि विविध देशांच्या अर्थव्यवस्थांवर प्रचंड ताण पडत असताना अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ भारताच्या दौऱ्यावर आले आहेत. अमेरिका आणि इराण यांच्यात लवकरच एखाद्या करारावर तोडगा निघेल, अशी आशा व्यक्त केली जात असली, तरी जोपर्यंत अधिकृत घोषणा होत नाही, तोपर्यंत कोणतीही शक्यता वर्तवणे घाईचे ठरेल. सध्याची कटू वस्तुस्थिती अशी आहे की, तेलाच्या वाढत्या किमतींमुळे आयातदार देशांचे आर्थिक ताळेबंद बिघडत आहेत. भारत आपल्या ऊर्जेच्या गरजांसाठी आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्याने या संकटाचा फटका देशाला बसत आहे. अशा गंभीर परिस्थितीत, वॉशिंग्टन भारताच्या ऊर्जा गरजा समजून घेण्यास आणि तेल पुरवठा करण्यास तयार असल्याचे रुबिओ यांचे विधान आशेचा किरण दाखवणारे असले, तरी त्यामागील व्यापारी गणिते समजून घ्यावी लागतील. भारताकडे रशिया, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि इराण यांसारख्या विश्वासू मित्रांचे पर्याय आधीच उपलब्ध आहेत. त्यामुळे अमेरिका आपल्याला या देशांच्या दरामध्ये तेल देणार का आणि तिथून होणारा वाहतूक खर्च परवडणारा असेल का, हा खरा कळीचा प्रश्न आहे. वेनेझुएलाच्या तेल साठ्यांवर नियंत्रण मिळवल्यानंतर, इराणच्या मुद्द्यावर अमेरिकेची रणनीती आता जगासमोर स्पष्ट झाली आहे. इराणकडे खनिज तेल आणि नैसर्गिक वायूचा अथांग साठा असून, जागतिक ऊर्जा बाजारात स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करणे आणि पेट्रोडॉलरचे अस्तित्व टिकवून ठेवणे हे अमेरिकेचे मुख्य उद्दिष्ट आहे. भारताकडून तेल आयातीवर दरवर्षी अब्जावधी डॉलर्स खर्च केले जातात, हे ओळखूनच रुबिओ यांनी भारताच्या ऊर्जा क्षेत्रात अमेरिकेचा वाटा मोठा असावा, अशी इच्छा व्यक्त केली आहे. जर आगामी काळात अमेरिका आणि इराण यांच्यात एखादा टिकाऊ करार झाला, तर इराणवरील आर्थिक निर्बंध शिथिल होऊ शकतात. यामुळे तेल उत्पादक देशांमध्ये एक नवीन स्पर्धा सुरू होईल, ज्याचा फायदा घेण्यास नवी दिल्ली निश्चितच उत्सुक असेल. मात्र, दुसरीकडे अमेरिकेने भारतीय उत्पादनांवर आयात शुल्क वाढवल्यामुळे दोन्ही देशांमधील व्यापारी संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. रुबिओ यांचा हा दौरा जर तो तणाव कमी करून एका न्याय्य व्यापारी करारासाठी मार्ग मोकळा करू शकला, तरच हा दौरा यशस्वी झाला असे म्हणता येईल. भारतीय परराष्ट्र धोरणासाठी हा काळ कसोटीचा आहे, कारण आपण आपल्या ऊर्जा गरजांसाठी पूर्णपणे अमेरिकेवर अवलंबून राहू शकत नाही. ट्रम्प प्रशासनाच्या लहरी कर धोरणामुळे आणि दहशतवादाच्या मुद्द्यावर अमेरिकेच्या भूमिकेत सातत्याचा अभाव राहिल्यामुळे भारताला सावध पवित्रा घ्यावा लागत आहे. याउलट, पश्चिम आशियाई देश आणि रशिया यांच्यासोबतचे आपले संबंध ऐतिहासिक आणि परखलेले आहेत. या जुन्या मित्रांना नाराज करून अमेरिकेच्या अवास्तव अटी स्वीकारणे भारताला परवडणारे नाही. तसेच, देशांतर्गत पातळीवर विरोधकांच्या राजकीय टीकेला तोंड देणेही सरकारला टाळावे लागेल. त्यामुळे अमेरिकेने भारतासोबत ऊर्जा व्यापार वाढवण्याची मोठी आशा बाळगण्यापूर्वी आपल्या ऑफरमध्ये लवचिकता आणणे आणि भारताच्या राष्ट्रीय हितसंबंधांचा आदर करणे गरजेचे आहे. जागतिक समीकरणांच्या या खेळात भारताला आपले स्वायत्त परराष्ट्र धोरण टिकवून ठेवावे लागेल, हाच या दौऱ्याचा मुख्य संदेश आहे. पुढील काळात भारताला केवळ आयात शुल्काच्या आघाड्यांवर नव्हे, तर डिजिटल अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि जागतिक पुरवठा साखळी यांसारख्या बहुआयामी स्तरांवर अमेरिकेशी वाटाघाटी कराव्या लागतील. ट्रम्प प्रशासनाचा व्यापारी दृष्टिकोन अत्यंत व्यावहारिक आणि नफा-तोटा केंद्रित असल्याने, भारतालाही आपल्या परराष्ट्र धोरणात अधिक आक्रमक व्यावसायिकता आणावी लागेल. वॉशिंग्टनशी असलेले संबंध सुधारताना मॉस्को आणि तेहरानसोबतची विश्वासू भागीदारी कायम राखणे, हाच भारताच्या सार्वभौमत्वाचा आणि आर्थिक स्वावलंबनाचा खरा विजय ठरेल.

# जनगणना प्रक्रियेत दिरंगाई करणाऱ्यांवर कडक कारवाई

## महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** जनगणना ही अत्यंत महत्त्वाची आणि कालमर्यादित प्रक्रिया असून, त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा, टाळाटाळ किंवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. ही प्रक्रिया अचूक, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे. जनगणनेदरम्यान माहिती संकलन, नोंदींची अचूकता आणि प्रशासकीय कामकाजामध्ये दक्षता बाळगावी. या कामामध्ये दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करा, असे निर्देश आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.

जनगणना २०२७ अंतर्गत सुरू असलेल्या गृहसूची व गृहनिर्माण जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, प्रेरणा सिनकर, मनोज सेठिया, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांच्यासह उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, राजेश आगळे, व्यंकटेश दुर्वास, कार्यकारी अभियंता महेश बरीदे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे यांच्यासह क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, राजाराम सरगर, अश्विनी गायकवाड, परशुराम वाघमोडे, अतुल पाटील, पूजा दुधनाळे, मुकेश कोळप आदी उपस्थित होते. जनगणनेसाठी माहिती संकलन करताना प्रत्येक नोंद अचूक राहील याची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. तसेच प्रशासकीय बाबींमध्ये दक्षता आणि शिस्त राखण्यावर भर द्यावा. याशिवाय, जनगणना ही केवळ नियमित शासकीय प्रक्रिया नसून भविष्यातील विकास आराखडे, नागरी सुविधा आणि धोरणनिर्मितीसाठी आधारभूत माहिती उपलब्ध करून देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम असल्याचे आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी नमूद केले.

या बैठकीत उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी जनगणना प्रक्रियेमध्ये क्षेत्रीय पातळीवरील समन्वय, प्रगणकांना आवश्यक सहकार्य आणि नागरिकांनी अचूक माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले. तसेच प्रगणक आणि पर्यवेक्षकांनी माहिती संकलन करताना काटेकोरपणे नियमांचे पालन करावे, असेही त्यांनी नमूद केले.

# स्वागतम ई-प्रवेश प्रणालीला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळेची बचत करणारी सेवा देण्यासाठी दि. १ मे २०२६ पासून मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेशासाठी 'स्वागतम ई-प्रवेश' ही ऑनलाइन नोंदणी प्रणाली सुरू केली आहे.

या प्रणालीला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून १ मे ते २५ मे २०२६ (सायंकाळी ४ वाजेपर्यंत) या कालावधीत सुमारे ७ हजार ८९४ नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे.

'स्वागतम ई-प्रवेश' प्रणालीअंतर्गत नागरिकांना महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन 'मुख्य इमारत प्रवेश प्रणाली' या लिंकद्वारे सहज नोंदणी करता येत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांना कमी वेळेत, सुरक्षित आणि सुलभ पद्धतीने मुख्य प्रशासकीय इमारतीत प्रवेश उपलब्ध करून देणे तसेच प्रत्येक प्रवेशाची अचूक नोंद ठेवणे हा आहे.

महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरून नोंदणीसाठी आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्यक असून नागरिकांनी या डिजिटल सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# ऊर्जा बचत व खर्च नियंत्रणासाठी उपाययोजना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासन यांनी ऊर्जा बचत, इंधन वापर नियंत्रण आणि खर्च नियंत्रणासंदर्भात जारी केलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सर्व विभागांसाठी महत्त्वाच्या सूचना जारी केल्या आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकानुसार अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभ्यास, प्रशिक्षण किंवा शासकीय कामकाजासाठी मंजूर असलेले परदेश दौरे पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात येणार आहेत. तसेच नवीन परदेश दौऱ्यांचे नियोजन टाळण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

महापालिकेकडून बाह्यस्त्रोताद्वारे उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या वाहनांमध्ये शक्य त्या प्रमाणात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. कार्यालयीन स्थळभेटी, पाहण्या आणि तपासणी दौरे यामध्ये कमी वाहनांचा वापर करून नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संयुक्त दौरे करताना कारपूलिंगचा अवलंब करावा, तसेच इंधन बचतीसाठी मेट्रो, रेल्वे, पीएमपीएमएल बस आणि इतर सार्वजनिक वाहतूक सुविधांचा वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. विभाग प्रमुख आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातील किमान एक दिवस सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा, असेही नमूद करण्यात आले आहे.

महापालिका स्तरावरील बैठका, प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्रे, आढावा बैठका आणि सेमिनार शक्यतो व्हिडीओ कॉन्फरन्सिंग किंवा ऑनलाइन प्रणालीद्वारे आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे प्रवास व इतर अनुषंगिक खर्चात बचत होणार आहे. तसेच जाहिराती, बॅनर्स, फ्लेक्स, सजावटीचे विद्युत दिवे आणि तत्सम खर्चिक बाबींचा वापर आवश्यकतेपुरता मर्यादित ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. सर्व कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा अधिकाधिक वापर करण्यास सांगण्यात आले असून कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, वातानुकूलन यंत्रणा, संगणक आणि इतर विद्युत उपकरणे बंद ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. वातानुकूलन यंत्रणेचे तापमान २४ ते २६ अंश सेल्सिअस दरम्यान ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महानगरपालिका क्षेत्रात पीएनजी (पाईप नॅचरल गॅस) वापराला प्रोत्साहन देण्यासाठी जोडणी, वितरण व्यवस्था आणि संबंधित पायाभूत सुविधांबाबत प्राप्त प्रस्तावांवर प्राधान्याने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पुढील सहा महिन्यांच्या कालावधीत अत्यावश्यक बाबी वगळता नवीन सल्लागार नियुक्ती प्रस्ताव सादर करणे टाळण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. या सर्व सूचनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी विभाग प्रमुखांवर सोपविण्यात आली आहे.

# काळेवाडीत किरकोळ वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** काळेवाडी परिसरात किरकोळ वादातून एका तरुणावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी चार जणांना पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न तसेच आर्म अॅक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना २३ मे २०२६ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास काळेवाडी येथील एम. एम. चौक परिसरात घडली. याप्रकरणी सचिन संपत शिंदे (वय २५, रा. आनंदनगर, चिंचवड) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी अजित राजू चौगुले (वय २५), अनिकेत राजेंद्र तुपे (वय १९), सचिन बाबासाहेब चौधरी (वय २६) आणि वसीम बाबर खान (वय २८) यांना अटक केली आहे. सर्व आरोपी थेरगाव व चिंचवड परिसरातील रहिवासी आहेत.

फिर्यादीच्या मेव्हण्याला विशाल गणपत भोसले (वय २५) याला किरकोळ कारणावरून आरोपींनी शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर हात, लाथाबुक्क्यांनी मारहाण करून धारदार शस्त्राने वार करत गंभीर जखमी केले. तसेच त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी काळेवाडी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१), ११५(२), ३(५) तसेच आर्म अॅक्ट कलम ४, २५, २७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गुरव करीत आहेत.

**मावळात घरात घुसून मारहाण**

**मावळ :** पुण्यातील मावळ तालुक्यातील लोढा बेलमोंडो सोसायटीमध्ये घरात घुसून मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी शिरगाव पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना २४ मे रोजी पहाटे टॉवर क्रमांक ३, फ्लॅट क्रमांक १२०२, लोढा बेलमोंडो सोसायटी, ता. मावळ येथे घडली. याप्रकरणी एका महिलेने फिर्याद दिली आहे. कुणाल कुमार (वय ३५), सूरभी सिन्हा (वय ३४), शांतनू शेखर (वय ३३) आणि श्वेताभ कुमार (वय २४, सर्व रा. बाणेर, पुणे) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, आरोपी हे फिर्यादीच्या घरी आले होते. त्यावेळी फिर्यादी घरात नसल्याने त्यांनी घरात घुसून फिर्यादीचे वडील रवींद्र कुमार चौबे यांच्याशी वाद घालत मारहाण केली. आरोपी क्रमांक १ याने त्यांच्या कानशिलात मारहाण केल्याचा आरोप आहे. तसेच इतर आरोपींनी शिवीगाळ करत पुन्हा मारहाण करण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी शिरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**गांधीनगर परिसरात तरुणावर हल्ला**

**पिंपरी :** पिंपरीतील गांधीनगर परिसरात जुन्या वादातून एका तरुणावर हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी संत तुकारामनगर पोलिस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २२ मे २०२६ रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास गांधीनगर येथील ताज बेकरीच्या मागील गल्लीत घडली. याप्रकरणी मिलिंद शाहूराव चाबुकस्वार (वय २८, रा. गांधीनगर, पिंपरी) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी कामावर जात असताना आरोपींनी त्यांना अडवून परिसरातील मुलांबाबत जाब विचारला. फिर्यादींना काही समजण्याआधीच एका आरोपीने त्यांची कॉलर पकडून ढकलले. तसेच दोघांनी मिळून त्यांना जवळ उभ्या असलेल्या दुचाकीवर पाडले. तिसऱ्या आरोपीने जवळील वस्तू उचलून फिर्यादींच्या डोक्यात मारल्याने ते जखमी झाले. जखमेतून रक्तस्राव सुरू झाल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. या प्रकरणी सौदागर हरिदास शिंदे, राजेंद्र विटकर आणि शिवडया यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तडीपार आरोपी कोयत्यासह अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड परिसरात तडीपार आदेशाचे उल्लंघन करत धारदार कोयता बाळगणाऱ्या एका सराईत आरोपीला निगडी पोलिसांनी अटक केली आहे.

ही कारवाई २४ मे २०२६ रोजी सकाळी सव्वाअकराच्या सुमारास संग्रामनगर झोपडपट्टी परिसरातील अंकुश चौकाजवळ करण्यात आली.

निगडी पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक ३०३/२०२६ नुसार आरोपी आयुब चमन खान (वय २८, रा. संग्रामनगर झोपडपट्टी, निगडी) याच्यावर भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ कलम ४(२५) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीवर यापूर्वी गुन्हे दाखल असून त्याला दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आले होते. तसेच १३ मे ते २६ मे २०२६ या कालावधीत लागू असलेल्या मनाई आदेशाचेही त्याने उल्लंघन केले.

आरोपीकडून सुमारे ३०० रुपये किमतीचा धारदार लोखंडी कोयता जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई गुन्हे शाखा युनिट-१ मधील पोलिसांनी केली असून पुढील तपास सुरू आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### खेड-शिवापूर टोल नाक्यावर अडथळा

**पुणे :** खेड शिवापूर टोल नाक्याजवळ अवैध पार्किंगचा प्रश्न गंभीर बनला असून, रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणावर अवजड वाहने, खासगी बस आणि इतर वाहनांची बेकायदेशीर उभी करण्यात येत असल्याने वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. या प्रकारामुळे अपघाताचा धोका वाढल्याची चिंता स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. महामार्गावरील वाढती वाहतूक, टोल नाक्यावर होणारी कोंडी आणि वारंवार घडणारे अपघात यामुळे प्रवासी त्रस्त असताना, रस्त्यालगत सुरू असलेल्या अवैध पार्किंगमुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. स्थानिकांनी या समस्येबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला असता, संबंधित अधिकाऱ्यांकडून समाधानकारक उत्तरे मिळाली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### विहिरीत पडून तरुणाचा मृत्यू

**उरुळी कांचन :** दारूच्या नशेत तोल गेल्याने विहिरीत पडून एका ४२ वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना उरुळी कांचन (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील आशिष एकनाथ कांचन यांच्या विहिरीत सोमवारी (दि. २५) दुपारी साडेतीनच्या सुमारास समोर आली. नासिर मगदुम सय्यद (वय ४२, रा. श्रीकृष्ण मंदिरामागे, उरुळी कांचन, ता. हवेली) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी उरुळी कांचन पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. महम्मद मगदुम सय्यद (वय ४९, व्यवसाय – बेकरी, रा. पांडुरंग कृपा बिल्डिंग, शिंदवणे रोड, उरुळी कांचन) यांनी खबर दिली. नासिर सय्यद हे दारूच्या नशेत असताना त्यांचा तोल जाऊन विहिरीत पडले. पाण्यात बुडाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

## ९० हून अधिक बांधकामांवर बुलडोझर

# शिरुरमध्ये अतिक्रमणांविरोधात मोहीम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**शिरूर :** शहरातील वाढत्या अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडी, नागरिकांची गैरसोय आणि सार्वजनिक रस्त्यांवरील अडथळे गंभीर बनत असल्याच्या पार्श्वभूमीवर शिरूर नगर परिषदेने सोमवारी मोठी अतिक्रमण हटाव मोहीम राबवली. या मोहिमेत शहरातील विविध भागांतील ९० हून अधिक टपऱ्या, पत्र्याची शेड, भिंती आणि इतर अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर चालवण्यात आला.

नगर परिषद प्रशासनाने सकाळपासूनच कारवाईला सुरुवात केली. शहरातील मुख्य रस्ते, चौक, बाजारपेठ परिसर आणि वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाच्या भागांमध्ये उभारण्यात आलेली अतिक्रमणे हटवण्यासाठी तीन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली होती.

प्रत्येक पथकासोबत महसूल कर्मचारी, बांधकाम विभागाचे अधिकारी आणि पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

शहरातील प्रमुख रस्त्यांच्या कडेला उभारलेल्या टपऱ्या, फेरीवाल्यांच्या शेड आणि अनधिकृत बांधकामांमुळे वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. काही ठिकाणी पादचारी मार्ग पूर्णपणे अडवले गेले होते. त्यामुळे नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत होत्या. नगर परिषद प्रशासनाने यापूर्वी संबंधितांना नोटिसा बजावत स्वखर्चाने अतिक्रमणे हटवण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र अनेकांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने अखेर प्रशासनाने थेट कारवाईचा निर्णय घेतला.

कारवाईदरम्यान काही अतिक्रमणधारकांनी प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी करत कारवाई थांबवण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी वादाचे प्रसंगही निर्माण झाले. मात्र पोलिसांच्या उपस्थितीत कारवाई सुरू ठेवण्यात आली.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणे हटवणे ही नियमित प्रक्रिया असून शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन ही मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत रस्त्याकडेला उभारलेली टपऱ्या, लोखंडी शेड, पत्र्याच्या खोल्या, तात्पुरत्या दुकानांची संरचना, भिंती आणि रस्त्यावर वाढवलेले प्लॅटफॉर्म हटवण्यात आले. काही व्यापाऱ्यांनी स्वतःहून साहित्य हटवले, तर अनेक ठिकाणी बुलडोझरच्या सहाय्याने अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली.

नगर परिषद प्रशासनाने स्पष्ट केले की, शहरातील अतिक्रमणांविरोधातील मोहीम पुढेही सुरू राहणार आहे. नव्याने अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

प्रशासनाने नागरिकांना सार्वजनिक रस्ते आणि मोकळ्या जागांवर अतिक्रमण न करण्याचे आवाहन केले असून, शहर सुटसुटीत आणि वाहतुकीस अनुकूल ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## रांजणीच्या पूर्वा वाघची खो-खो स्पर्धेसाठी निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील रांजणी गावातील पूर्वा विजय वाघ हिची ५२ वी कुमार-मुली गट राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिच्या या यशामुळे रांजणी गावासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन व सोलापूर ॲमेच्युअर खो-खो असोसिएशन यांच्या मान्यतेने ही राज्यस्तरीय स्पर्धा २ जून ते ५ जून दरम्यान सोलापूर येथील शासकीय मैदानावर आयोजित करण्यात आली आहे. राज्यभरातील उत्कृष्ट खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार असून त्यातून पुढील राष्ट्रीय स्पर्धांसाठी निवड प्रक्रिया पार पडणार आहे.

पूर्वा वाघ ही सध्या जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथील रा. प. सबनीस विद्यालयामध्ये इयत्ता बारावी विज्ञान शाखेत शिक्षण घेत आहे. लहानपणापासूनच तिने खो-खो खेळात विशेष प्राविण्य मिळवले असून विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तिला राष्ट्रीय खो-खो प्रशिक्षक संदीप चव्हाण यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. कठोर सराव, जिद्द आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर तिने राज्यस्तरीय स्पर्धेत स्थान मिळवले आहे.

पूर्वाच्या या निवडीबद्दल रांजणी ग्रामस्थ, क्रीडाप्रेमी तसेच शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी तिचे विशेष अभिनंदन केले असून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## अंमली पदार्थांचे उच्चाटन करा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भवानीनगर :** पुणे जिल्ह्यात युवक वर्ग मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांच्या विळख्यात अडकत चालल्याने अंमली पदार्थ विक्रेत्यांविरोधात कठोर कारवाई करून जिल्ह्यातून या घातक प्रवृत्तीचे समूळ उच्चाटन करण्यात यावे, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवक प्रदेशाध्यक्ष अमरसिंह कदम यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्याकडे केली आहे.

याबाबत अमरसिंह कदम व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षकांची प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली तसेच निवेदन सादर केले.

निवेदनात जिल्ह्यातील तरुण-तरुणी मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांच्या आहारी जात असून त्याचा परिणाम म्हणून काही भागांमध्ये गुन्हेगारीची परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

गांजा, भांग, चरस, हेरॉईन, ब्राऊन शुगर, मेथाम्फेटामाइन, अफू आणि कोकेन यांसारख्या अंमली पदार्थांचा वापर वाढत असल्याची चिंता संघटनेने व्यक्त केली आहे. शहरी तसेच ग्रामीण भागातील शाळा, महाविद्यालये, तरुण मंडळे आणि काही निवडक ठिकाणे ही अंमली पदार्थ विक्रीची केंद्रे बनत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, शहरी भागानंतर आता ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात युवक-युवतींना या व्यसनाच्या जाळ्यात ओढले जात आहे. ग्रामीण भागातील शाळा, कॉलेज, अवैध दारू दुकाने, काही पानटपऱ्या आणि गुन्हेगारी टोळ्यांच्या माध्यमातून अंमली पदार्थांचे सेवन व विक्री सुरू असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

विशेषतः १५ ते १६ वर्षे वयोगटातील अल्पवयीन युवक या व्यसनाधीनतेच्या विळख्यात सापडत असल्याने भविष्यात देशाच्या युवा पिढीसमोर गंभीर संकट उभे राहू शकते, अशी भीती अमरसिंह कदम यांनी व्यक्त केली. त्यामुळे जिल्हा पोलीस प्रशासनाने विशेष अंमली पदार्थविरोधी पथके सक्रिय करून कठोर मोहीम राबवावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

## खडकवाडीत केबल चोरट्यांचा धुमाकूळ

### पन्नासहून अधिक शेतकऱ्यांच्या विज पंपांच्या केबल चोरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील रांजणी गावातील खडकवाडी परिसरात अज्ञात चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या विज पंपांच्या केबल चोरी करून मोठा धुमाकूळ घातला आहे. या घटनेत पन्नासहून अधिक शेतकऱ्यांच्या विद्युत पंपांच्या केबल लंपास करण्यात आल्या असून सुमारे सहा लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आधीच कमी बाजारभाव, अवकाळी पावसाचे संकट आणि वाढते उत्पादन खर्च यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर या चोरीमुळे आणखी मोठे संकट कोसळले आहे.

रांजणी गावातील खडकवाडी परिसरात मीना नदी पात्रातील नरसिंह बंधाऱ्याजवळ सुमारे ५५ हून अधिक शेतकऱ्यांचे विज पंप आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (दि. २५) रात्री अज्ञात चोरट्यांनी शेतकऱ्यांनी विज पंपांसाठी टाकलेल्या केबल कापून नेल्या. त्यानंतर मीना नदी पात्राच्या पलीकडे केबलचे आवरण जाळून त्यातील तांब्याच्या तारा लंपास करण्यात आल्या. मंगळवारी सकाळी शेतकरी विज पंप सुरू करण्यासाठी गेले असता ही बाब उघडकीस आली. अनेक ठिकाणी केबल कापलेल्या अवस्थेत आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

विशेष म्हणजे, गेल्या सहा महिन्यांतील ही दुसरी मोठी चोरीची घटना आहे. यापूर्वीही अशाच प्रकारे केबल चोरी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. मात्र, त्या घटनेतील चोरट्यांचा अद्याप शोध लागलेला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. वारंवार होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे शेतकरी भयभीत झाले असून रात्री नदीपात्र परिसरात जाऊन विज पंप आणि केबलची राखण करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

सध्या शेतीमालाला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटातून जात आहेत. त्यातच अवकाळी पावसामुळे अनेक पिकांचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत विज पंपांच्या केबल चोरीमुळे शेतीचे नियोजन कोलमडले असून पिकांना पाणी देण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. नवीन केबल खरेदी करण्यासाठी मोठा खर्च करावा लागणार असल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

दरम्यान, वारंवार तक्रारी करूनही चोरट्यांचा बंदोबस्त करण्यात पोलिसांना अपयश येत असल्याची भावना बाधित शेतकरी बंडेश वाघ, योगेश भोर, पुरुषोत्तम निकम, विशाल हांडे, महादू निकम, बंडू भोर, प्रकाश वाघ, सचिन वाघ, चैतन्य वाघ, खंडू भोर, महेंद्र भोर आणि प्रवीण भोर यांनी व्यक्त केली. संबंधित चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन कठोर कारवाई करावी तसेच ग्रामीण भागात रात्रीच्या गस्तीत वाढ करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## निर्मलाताई पानसरे पुरस्काराने सन्मानित




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा निर्मलाताई सुखदेव पानसरे यांना स्व. रामभाऊ बराटे यांच्या स्मरणार्थ आयोजित कार्यक्रमात 'आदर्श जिल्हा परिषद पदाधिकारी पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. महाराष्ट्राचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते रविवारी (दि. २४) हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, माजी अध्यक्ष जालिंदर कामठे, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे, पांडुरंग पवार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना निर्मलाताई पानसरे म्हणाल्या, "सामाजिक व ग्रामविकास क्षेत्रातील कार्याची दखल घेत मला हा पुरस्कार देण्यात आला, याबद्दल मी आयोजकांची आभारी आहे. हा सन्मान माझ्यावर अधिक जबाबदारी टाकणारा असून पुढील सामाजिक कार्यासाठी प्रेरणादायी ठरेल."

मागील वर्षी हा पुरस्कार वितरण सोहळा राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते पार पडला होता. यंदा कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

## वाघ-खिलारी वस्तीत गतिरोधक बसवण्याची मागणी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील अष्टविनायक महामार्गावर रांजणी व नागापूर गावांच्या सरहद्दीवरील वाघ-खिलारी वस्तीजवळ तातडीने गतिरोधक बसवावेत, अशी मागणी रांजणी गावचे उपसरपंच विजय वाघ यांनी केली आहे.

अष्टविनायक महामार्गावर रांजणी-नागापूर गावांच्या हद्दीत वाघ-खिलारी वस्ती आहे. येथे अंगणवाडी शाळा असून महामार्गाच्या एका बाजूला हॉटेलदेखील आहे. त्यामुळे परिसरात नागरिक, शाळकरी मुले तसेच वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. या मार्गावरून लहान-मोठ्या वाहनांसह अवजड वाहनांचीही मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू असते. वाहनांचा वेग भरधाव असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे संभाव्य अपघात टाळण्यासाठी येथे गतिरोधक बसवण्याची गरज असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने या ठिकाणी तातडीने गतिरोधक बसवावेत, अशी मागणी उपसरपंच विजय वाघ तसेच स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे.

## स्वसमाधान शिबिरांतर्गत ग्रामस्थांना लाभ




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** इंदापूर तालुक्यातील लासुर्णे (चिखली फाटा) येथे आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्वसमाधान शिबिरामध्ये सणसर-लासुर्णे जिल्हा परिषद गटातील सुमारे ६०० ग्रामस्थांनी शासनाच्या विविध योजनांचा मोफत लाभ घेतल्याची माहिती जिल्हा परिषद सदस्या माधुरी सागर भिसे यांनी दिली. या शिबिरासाठी तहसीलदार जीवन बनसोडे यांच्यासह महसूल विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. शिबिराला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ग्रामस्थांची मोफत आरोग्य तपासणी तसेच डोळ्यांची तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर काही ग्रामस्थांना पुढील उपचारासाठी पुणे येथे पाठवण्यात आले. या शिबिरासाठी भारती हॉस्पिटल आणि गिरीराज हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी सहकार्य केले. डोळ्यांची तपासणी केल्यानंतर २५ ग्रामस्थांना मोफत डोळ्यांच्या शस्त्रक्रियेसाठी भारती हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले. सातबारा उताऱ्यातील दुरुस्ती, पाणंद रस्त्यांच्या अडचणी, रेशन कार्डमधील दुरुस्त्या, जातीचे दाखले, शाळेचे दाखले आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. महसूल विभागाशी संबंधित अडचणी सोडवण्यासाठी या शिबिराच्या माध्यमातून ग्रामस्थांना मदत करण्यात आली.

## धरणकाठच्या गावांनाही घोटभर पाण्यासाठी भटकंती

# भीमाशंकर परिसरात तीव्र पाणीटंचाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**अवसरी :** आंबेगाव तालुक्यातील पश्चिम आदिवासी भागात सध्या तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. धरणांच्या परिसरातील गावांमध्येही 'धरण उशाला आणि कोरड घशाला' अशी परिस्थिती निर्माण झाली असून, महिलांना घोटभर पाण्यासाठी अनेक किलोमीटर पायपीट करावी लागत आहे.

आहुपे, पाटण, आसाणे आणि भीमाशंकर खोऱ्यातील अनेक गावांमध्ये उन्हाळ्याच्या तीव्र झळांमुळे पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. हा परिसर अतिवृष्टीचा म्हणून ओळखला जात असला तरी उन्हाळा सुरू होताच नागरिकांना हंडाभर पाण्यासाठी डोंगर-दऱ्यांत भटकंती करावी लागत असल्याचे चित्र आहे.

अनेक जलजीवन मिशनअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या नळपाणी योजना अपूर्ण अवस्थेत आहेत, तर काही योजना नादुरुस्त झाल्याने त्यांचा लाभ नागरिकांना मिळत नाही. अनेक ठिकाणी गाळमिश्रित आणि अशुद्ध पाण्यावर नागरिकांना अवलंबून राहावे लागत आहे. भीमाशंकर परिसरात दोन प्रादेशिक पाणीपुरवठा योजना कार्यरत असल्या तरी त्या वारंवार बंद पडणे, कमी दाबाने पाणीपुरवठा होणे आणि दोन-दोन दिवसांनी पाणी येणे, अशा समस्यांमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

पिंपरी, साकेरी, कुशिरे, पाटण, पंचाळे, आडिवरे, वचपे, कोलतावडे, बोरघर आणि फुलवडे या धरणकाठच्या गावांमध्येही परिस्थिती गंभीर आहे. नागरिकांना पाण्यासाठी डोंगर-टेकड्या चढ-उतार करत दूरवर जावे लागत असून जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न बिकट बनला आहे.

परिसरात तळी, विहिरी, शिवकालीन पाण्याच्या टाक्या आणि बंधारे उभारण्यात आले असले तरी योग्य नियोजनाअभावी अनेक प्रकल्प निष्प्रभ ठरत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. निकृष्ट दर्जाची कामे, चुकीची जागा निवड, ठेकेदारांची उदासीनता आणि प्रशासकीय दिरंगाई यामुळे कोट्यवधी रुपये खर्चूनही पाणी योजनांचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, तालुक्याचे आमदार तथा माजी सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी आदिवासी भागातील पाणी योजनांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला होता. मात्र संबंधित यंत्रणांच्या निष्काळजीपणामुळे अनेक योजना प्रभावीपणे कार्यान्वित झाल्या नसल्याची टीका स्थानिकांकडून केली जात आहे.

## माउलींच्या दर्शनाचा मार्ग खडतर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** आळंदीतील संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर परिसरात अतिक्रमण, बेशिस्त पार्किंग आणि निष्क्रिय बॅरिकेट्स यामुळे भाविकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. मंदिराच्या महाद्वारापर्यंत पोहोचण्यासाठी भाविकांना अक्षरशः अडथळ्यांची शर्यत पार करावी लागत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

मंदिर परिसरातील मुख्य रस्ते, प्रदक्षिणा मार्ग आणि देहू फाटा परिसरात दुकानदारांचे वाढते अतिक्रमण गंभीर समस्या बनली आहे. अनेक ठिकाणी हातगाड्या, तात्पुरती दुकाने आणि फेरीवाल्यांनी पदपथ व्यापल्यामुळे पादचाऱ्यांना चालणे कठीण झाले आहे. त्यातच रस्त्याच्या कडेला अनियमितपणे उभ्या केल्या जाणाऱ्या दुचाकी आणि चारचाकींमुळे वाहतूक कोंडी वाढत आहे. स्थानिक नागरिक आणि भाविकांच्या म्हणण्यानुसार, पोलिसांनी उभारलेले अनेक बॅरिकेट्स वापराविना पडून आहेत. वाहतूक नियंत्रणासाठी उभारण्यात आलेल्या या उपाययोजना प्रत्यक्षात अडथळाच ठरत असून प्रशासनाकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. विशेषतः सुट्टीच्या दिवशी आणि धार्मिक कार्यक्रमांच्या काळात मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनते. यापूर्वीही भाविकांकडून खासगी पार्किंगमधील जादा शुल्क आणि अपुऱ्या वाहनतळ सुविधांबाबत तक्रारी करण्यात आल्या होत्या.

## सारांश वृत्त

### हत्तीच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू

**वायनाड (केरळ):** येथे मंगळवारी जंगली हत्तीच्या हल्ल्यात एका महिलेचा मृत्यू झाला आणि तिचा पती जखमी झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. मृत व्यक्तीची ओळख पुथुमाला येथील रहिवासी जेसी अशी पटली आहे. ती तिचा पती शाजी याच्यासोबत स्कूटरने प्रवास करत असताना मेप्पडीजवळील कल्लाडी येथे एका जंगली हत्तीने त्यांच्यावर हल्ला केला, असे सांगण्यात आले. जेसीचा जागीच मृत्यू झाला, तर तिचा पती जखमी झाला.

### कार अपघातात वडील-मुलगी ठार

**संभल (उत्तर प्रदेश) :** संभलमध्ये मंगळवारी गंगा द्रुतगती मार्गावर मर्सिडीजसह दोन गाड्यांची समोरासमोर धडक होऊन वडील आणि मुलीचा मृत्यू झाला, तर पाच जण जखमी झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली. कैला देवी पोलीस ठाण्याचे प्रभारी राधेश्याम शर्मा यांनी सांगितले की, अझरा गावाजवळ हा अपघात झाला, जेव्हा एक फोक्सवॅगन पोलो गाडी कथितरित्या चुकीच्या बाजूने द्रुतगती मार्गावर शिरली आणि नोएडाहून लखनौला जाणाऱ्या मर्सिडीज गाडीला समोरून धडकली. त्यांनी सांगितले की, चंदाउसी येथील रहिवासी फूल सिंग यांचा मुलगा अरविंद कुमार (५५) आणि त्यांची मुलगी यामिनी (३०), जे पोलो कारमधून प्रवास करत होते, यांचा अपघातात मृत्यू झाला.

### अंमली पदार्थ तस्कराची मालमत्ता जप्त

**श्रीनगर :** अनंतनाग जिल्ह्यात एका अमली पदार्थ तस्कराची सुमारे १ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली. एका पोलीस प्रवक्त्याने सांगितले की, येथे नोंदवलेल्या एका अमली पदार्थांच्या प्रकरणासंदर्भात श्रीनगर पोलिसांनी एका अमली पदार्थ तस्कराची स्थावर मालमत्ता जप्त केली आहे. ही कारवाई सुरू असलेल्या 'नशा मुक्त जेके अभियान' अंतर्गत अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात पोलिसांच्या सातत्यपूर्ण कारवाईचा एक भाग होती.

## पर्यावरण कार्यकर्ते आणि माजी अधिकाऱ्यांचे खुले पत्र

# सरन्यायाधीश सूर्यकांत यांचे व्यक्तव्य वादात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या विकास प्रकल्प आणि पर्यावरणीय याचिकांबाबत केलेल्या वक्तव्यावरून नवा वाद निर्माण झाला आहे. माजी सनदी अधिकारी, वकील, कायदेविषयक तज्ज्ञ आणि पर्यावरण कार्यकर्त्यांच्या विविध गटांनी सरन्यायाधीशांना खुले पत्र लिहून त्यांच्या टिप्पणीवर तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

११ मे रोजी न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर गुजरातमधील पिपावाव बंदर विस्तार प्रकल्पासंदर्भातील पर्यावरण मंजुरी प्रकरणाची सुनावणी झाली होती. या वेळी विकास प्रकल्पांना विरोध करणाऱ्या याचिकांवर भाष्य करताना सरन्यायाधीशांनी "या देशातील असा एकही प्रकल्प दाखवा, ज्याचे तथाकथित पर्यावरणवादी स्वागत करतात," असे वक्तव्य केले होते.

सुनावणीदरम्यान त्यांनी असेही म्हटले होते की, "प्रत्येक गोष्ट न्यायालयात खेचली जाते. अशा याचिकांचा उद्देश विकास रोखणे हाच असतो. बंदरांचा विस्तार नको असेल, तर देशाची प्रगती कशी होणार?" या वक्तव्यांनंतर पर्यावरण कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

हे प्रकरण राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने पिपावाव बंदर विस्तारासंदर्भातील पर्यावरण मंजुरीविरोधातील अपील फेटाळल्याशी संबंधित होते. सर्वोच्च न्यायालयाने एनजीटीचा आदेश कारणांशिवाय दिला गेल्याचे नमूद करत याचिकाकर्त्यांना पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याची मुभा दिली होती. मात्र, सुनावणीदरम्यान झालेल्या टिप्पणींवरून वाद निर्माण झाला.

२२ मे रोजी 'कॉन्स्टिट्यूशन कंडक्ट ग्रुप' या माजी सनदी अधिकारी, वकील आणि पर्यावरण कार्यकर्त्यांच्या मंचातील ७१ सदस्यांनी खुले पत्र लिहून सरन्यायाधीशांच्या वक्तव्याचा निषेध केला. या पत्रात म्हटले आहे की, अशा टिप्पणींमुळे पर्यावरणीय संरक्षणासाठी अस्तित्वात असलेल्या सुरक्षा यंत्रणा कमकुवत होऊ शकतात आणि कनिष्ठ न्यायालयांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो.

पत्रात पर्यावरण मंत्रालयाच्या तज्ज्ञ समित्यांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. "बहुतांश वैधानिक आणि तज्ज्ञ संस्थांमध्ये केवळ सरकारी किंवा निवृत्त अधिकारी असतात आणि त्या सरकारसाठी केवळ रबर स्टॅम्पप्रमाणे काम करतात," असा आरोप पत्रात करण्यात आला आहे. याशिवाय, देशभरातील ६०० हून अधिक नागरिक आणि नागरी समाज संघटनांनी स्वाक्षरी केलेल्या दुसऱ्या खुल्या पत्रात म्हटले आहे की, या टिप्पणींमुळे पर्यावरणीय निर्णयांची कायदेशीर छाननी करणाऱ्या नागरिकांना संशयाच्या नजरेतून पाहिले जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

दरम्यान, ७२ वकील, कायद्याचे विद्यार्थी, शिक्षक आणि कायदेविषयक कार्यकर्त्यांनीही स्वतंत्र खुले पत्र पाठवून सरन्यायाधीशांनी आपली टिप्पणी मागे घ्यावी, अशी मागणी केली आहे. पर्यावरण संरक्षणासाठी कायदेशीर मार्गाने लढणाऱ्या नागरिकांवर अन्यायकारकपणे शंका उपस्थित केल्याचा आरोप या पत्रात करण्यात आला आहे.

## इंधन दरवाढीवरून खर्गेंची केंद्रावर टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी मंगळवारी इंधन दरवाढीवरून केंद्र सरकारवर जोरदार टीका करत, गेल्या १२ वर्षांत कच्च्या तेलाच्या किमती घसरल्या असतानाही जनतेला दिलासा का देण्यात आला नाही, असा सवाल उपस्थित केला.

खर्गे यांनी सांगितले की, २६ मे २०१४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पदभार स्वीकारला, त्या वेळी भारतीय बास्केटमधील कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल १०८.०५ अमेरिकन डॉलर होती आणि डॉलर-रुपया विनिमय दर ५८.५९ रुपये होता. त्या वेळी पेट्रोल ७१.५१ रुपये प्रति लिटर आणि डिझेल ५६.७१ रुपये प्रति लिटर दराने उपलब्ध होते, असे त्यांनी एक्सवरील आपल्या हिंदी पोस्टमध्ये म्हटले आहे.

आज कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल ९९ डॉलरपेक्षा कमी असतानाही पेट्रोल आणि डिझेलचे दर अनुक्रमे १०२.१२ रुपये आणि ९५.२० रुपये प्रति लिटरपर्यंत वाढले आहेत, असे खर्गे म्हणाले. कच्चे तेल स्वस्त झाले असतानाही पेट्रोल सुमारे ४२.८ टक्क्यांनी आणि डिझेल सुमारे ६७.९ टक्क्यांनी महाग झाले आहे, असा दावा त्यांनी केला.

प्रत्येक अर्थतज्ज्ञाला माहिती आहे की पेट्रोल आणि डिझेलच्या वाढत्या किमतींचा परिणाम प्रत्येक क्षेत्रावर होतो. वाहतुकीपासून अन्नधान्यापर्यंत सर्वसामान्यांवरील महागाईचा बोजा सतत वाढत आहे. असे असूनही सरकारची नफेखोरी सुरूच आहे, असे खर्गे म्हणाले. प्रश्न सरळ आहे कच्च्या तेलाच्या किमती घसरल्या असताना पेट्रोल आणि डिझेल महाग का झाले? जनतेला दिलासा का मिळत नाही? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, सोमवारी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर २.६१ ते २.७१ रुपयांची वाढ करण्यात आली. दोन आठवड्यांपेक्षा कमी कालावधीतील ही चौथी दरवाढ असून, सरकारी मालकीच्या इंधन कंपन्यांनी वाढत्या आंतरराष्ट्रीय तेल किमतींचा भार ग्राहकांवर टाकणे सुरूच ठेवले आहे.

## बिहार विधान परिषद निवडणुकांची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाटणा :** बिहारच्या राजकीय वर्तुळातून एक महत्त्वपूर्ण बातमी समोर आली आहे. निवडणूक आयोगाने बिहार विधान परिषदेच्या नऊ रिक्त जागांसाठी द्विवार्षिक निवडणुका आणि एका रिक्त जागेसाठी पोटनिवडणूक अधिकृतपणे जाहीर केली आहे. मंगळवारी जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार, राज्यातील प्रमुख राजकीय पक्षांनी तयारीला सुरुवात केली असून उमेदवारांच्या निवडीसाठी जोरदार लॉबिंग सुरू झाले आहे.

विधानसभेतील सध्याच्या संख्याबळाच्या पार्श्वभूमीवर काही जागांचे निकाल जवळपास निश्चित मानले जात असले, तरी या निवडणुकांमुळे बिहारच्या राजकारणात नवी समीकरणे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. निवडणूक आयोगाच्या घोषणेनुसार, विधानसभेच्या कोट्यातून विधान परिषदेच्या एकूण नऊ जागांसाठी निवडणुका घेतल्या जाणार आहेत. ज्या सदस्यांचा कार्यकाळ संपत आहे त्यामध्ये डॉ. कुमुद वर्मा, प्रा. गुलाम गौस, मोहम्मद फारूक, भीष्म साहनी, श्री भगवान सिंग कुशवाह, संजय प्रकाश, समीर कुमार सिंग, सम्राट चौधरी आणि सुनील कुमार सिंग यांचा समावेश आहे. या जागांसाठी राजकीय पक्षांमध्ये रणनीतिक हालचालींना वेग आला असून, उमेदवार निश्चितीसाठी पक्षांतर्गत चर्चा सुरू आहेत. या नऊ जागांव्यतिरिक्त बिहारचे माजी मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या विधान परिषद जागेसाठीही पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली आहे.

१ जून रोजी अधिकृत अधिसूचना जारी करण्यात येईल. त्यानंतर उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होईल. सर्व जागांसाठी १८ जून रोजी मतदान होणार असून, त्याच दिवशी निकाल जाहीर करण्यात येणार आहेत.

## कर्नाटकात नेतृत्वबदलाच्या चर्चांना वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** कर्नाटकमधील संभाव्य नेतृत्वबदलाच्या चर्चांना पुन्हा वेग आला असून मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार हे काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाशी चर्चा करण्यासाठी मंगळवारी पहाटे नवी दिल्लीत दाखल झाले. या बैठकीकडे कर्नाटकातील सत्ताबदलाच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

हायकमांडसोबतच्या चर्चेपूर्वी सिद्धरामय्या यांनी काँग्रेस मुख्यालय इंदिरा भवन येथे पक्षाचे महासचिव के. सी. वेणुगोपाल आणि रणदीप सुरजेवाला यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी नवी दिल्लीतील कर्नाटक भवन येथे मंत्री आणि वरिष्ठ नेत्यांसोबत नाश्त्याची बैठकही घेतली. या बैठकीला एम. बी. पाटील, जी. परमेश्वर, सतीश जारकीहोळी, के. जे. जॉर्ज आणि इतर वरिष्ठ नेते उपस्थित होते.

दरम्यान, सुमारे १७ आमदार आधीच कर्नाटक भवन येथे दाखल झाले असून आणखी आमदार येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, सचिन पायलट यांच्यासह पक्षाचे इतर वरिष्ठ नेतेही बैठकीसाठी इंदिरा भवन येथे दाखल झाले.

प्रसारमाध्यमांशी थोडक्यात संवाद साधताना डी. के. शिवकुमार यांनी "बैठकीत सहभागी होण्यासाठी कर्नाटक भवनात जात आहे," एवढेच सांगितले. तर मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी नेतृत्वबदलाबाबत थेट प्रतिक्रिया देण्याचे टाळले.

बैठकीच्या अजेंड्याबाबत बोलताना मंत्री एम. बी. पाटील यांनी "नेमका अजेंडा फक्त राहुल गांधींनाच माहिती आहे," असे सांगितले. त्यांनी राज्यसभा निवडणुका, विधान परिषद निवडणुका आणि संभाव्य मंत्रिमंडळ फेरबदल यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा होऊ शकते, असे संकेत दिले.

काँग्रेस आमदार सी. पुत्तरंगशेट्टी यांनी स्वतःला "सिद्धरामय्या यांचा शिष्य" म्हणवत नेतृत्वबदलाचा निर्णय हायकमांडवर अवलंबून असल्याचे स्पष्ट केले. "सध्या सिद्धरामय्या मुख्यमंत्री आहेत. भविष्यात काय होते ते पाहावे लागेल," असे ते म्हणाले.

## अब्राहम करारात सामील होण्यास पाकचा विरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी पॅलेस्टिनी प्रश्नावरील पाकिस्तानच्या जुन्या भूमिकेचा पुनरुच्चार करत, इस्रायलसोबत संबंध सामान्य करण्यासाठी इस्लामाबादने अब्राहम करारात सामील होण्यास विरोध असल्याचे स्पष्ट केले आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी इराणसोबत शांतता चर्चेत सहभागी देशांना 'अब्राहम करारा'त सहभागी होण्याचे आवाहन केल्यानंतर आसिफ यांनी ही भूमिका मांडली. या कराराचा उद्देश इस्रायल आणि अरब राष्ट्रांमध्ये राजनैतिक, आर्थिक आणि सुरक्षा संबंध प्रस्थापित करणे हा आहे.

संयुक्त अरब अमिरात आणि बहरीन यांनी यापूर्वीच या करारावर स्वाक्षरी केली आहे. तर सौदी अरेबिया, कतार, पाकिस्तान, तुर्कस्तान, इजिप्त आणि जॉर्डन हे देशही यात सामील होतील, अशी आशा ट्रम्प यांनी व्यक्त केली होती. आसिफ यांनी सांगितले की, १९६७ पूर्वीच्या सीमांनुसार पूर्व जेरुसलेमला राजधानी असलेले स्वतंत्र पॅलेस्टिनी राष्ट्र स्थापन होईपर्यंत पाकिस्तान इस्रायलला मान्यता देणार नाही. इस्रायलच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित करत ते म्हणाले, ज्यांच्या शब्दावर एका दिवसासाठीही विश्वास ठेवता येत नाही, अशा लोकांसोबत तुम्ही कसे बसणार? त्यांनी पाकिस्तानच्या पासपोर्ट धोरणाचाही उल्लेख केला. पाकिस्तानच्या पासपोर्टवर तो इस्रायलच्या प्रवासासाठी वैध नसल्याचे स्पष्टपणे नमूद केलेले आहे. इस्रायलसोबत संबंध सामान्य करण्याच्या कोणत्याही हालचालीचे टीकाकार असलेल्या आसिफ यांनी गेल्या महिन्यात इस्रायलला मानवतेवरील शाप, असे संबोधत त्या देशावर प्रदेशात नरसंहार केल्याचा आरोप केला होता.

## सागरी सुरक्षा, बंदर विकास आणि खनिज पुरवठ्यावर भर

# क्वाड बैठकीत मोठ्या निर्णयांची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** येथे झालेल्या क्वाड परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील सुरक्षा, सागरी सहकार्य, बंदर विकास आणि अत्यावश्यक खनिज पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रमांची घोषणा केली. क्वाड देशांचा एकत्रित वाटा जगाच्या एकूण जीडीपीपैकी सुमारे एक तृतीयांश असून या देशांची लोकसंख्या २ अब्जांहून अधिक असल्याचे सांगत रुबियो यांनी या युतीचे महत्त्व अधोरेखित केले.

रुबियो म्हणाले की, क्वाड हा केवळ आर्थिकदृष्ट्या मजबूत देशांचा समूह नसून लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणाऱ्या आणि समान हितसंबंध जपणाऱ्या राष्ट्रांचा सामरिक मंच आहे. त्यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांत क्वाडने केवळ चर्चा मंच म्हणून न राहता प्रत्यक्ष कृती करणाऱ्या रणनीतिक भागीदारीचे स्वरूप धारण केले आहे.

बैठकीतील प्रमुख घोषणांमध्ये "इंडो-पॅसिफिक मेरिटाइम सर्व्हिलन्स कोऑपरेशन इनिशिएटिव्ह" या नव्या उपक्रमाचा समावेश आहे. या माध्यमातून क्वाड सदस्य देशांमध्ये सागरी निगराणी माहितीची देवाणघेवाण वाढवली जाणार आहे. यासोबतच "इंडो-पॅसिफिक मेरिटाइम डोमेन अवेअरनेस इनिशिएटिव्ह"चा विस्तार करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे.

या उपक्रमामुळे इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील देशांना जवळपास रिअल-टाइम सागरी हालचालींचा डेटा उपलब्ध होणार आहे. सागरी सुरक्षेच्या मुद्द्यावर बोलताना रुबियो यांनी जागतिक सागरी व्यापारातील सुमारे ६० टक्के व्यापार इंडो-पॅसिफिक क्षेत्रातून होत असल्याचे नमूद केले. त्यामुळे या भागातील सुरक्षा ही केवळ क्वाड देशांसाठी नव्हे, तर जगभरातील अनेक राष्ट्रांसाठी महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत पॅसिफिक बेटांमधील बंदर पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी संयुक्त भागीदारीचीही घोषणा करण्यात आली. सुरुवातीला फिजी येथील बंदर विकासावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. याशिवाय "क्वाड क्रिटिकल मिनरल्स फ्रेमवर्क" या नव्या चौकटीची घोषणा करण्यात आली. या माध्यमातून अत्यावश्यक खनिजांच्या खाणकाम, प्रक्रिया आणि पुनर्वापर क्षेत्रात गुंतवणूक वाढवून पुरवठा साखळी अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे. जागतिक स्तरावर वाढत्या पुरवठा साखळी संकटाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

रुबियो यांनी या बैठकीचे आयोजन केल्याबद्दल एस. जयशंकर आणि भारत सरकारचे आभार मानले.

## रिक्त पदांवर 'सर्वोच्च' नाराजी; केंद्राला नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी आयकर अपील न्यायाधिकरणातील (आयटीएटी) अनेक पदे दीर्घकाळ रिक्त राहिल्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त करत केंद्र सरकारला नोटीस बजावली. तसेच न्यायिक कामकाज सुरळीत ठेवण्यासाठी उच्च न्यायालयांनी न्यायिक अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर पाठवावे, असे निर्देशही दिले.

आयटीएटीचे माजी उपाध्यक्ष परवीन कुमार बन्सल यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने केंद्र सरकारकडून याबाबत सविस्तर उत्तर मागवले. खंडपीठाने या प्रकरणात ॲटर्नी जनरल आर. व्यंकटरमणी यांची मदतही मागितली असून, आयकर अपील न्यायाधिकरणातील रिक्त पदे तातडीने भरण्यासाठी आवश्यक पावले उचलण्यास सांगितले. सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी न्यायालयाला सांगितले की, रजिस्ट्रारसह अनेक महत्त्वाची पदे गेल्या अनेक वर्षांपासून रिक्त आहेत. त्यामुळे न्यायाधिकरणाच्या कामकाजावर गंभीर परिणाम होत असून प्रलंबित प्रकरणांचा भार वाढत आहे. यावर सर्वोच्च न्यायालयाने आश्चर्य व्यक्त करत इतक्या दीर्घकाळ पदे रिक्त का ठेवण्यात आली, असा प्रश्न उपस्थित केला. न्यायालयाने स्पष्ट केले की या प्रकरणाची प्रशासकीय पातळीवर चौकशी केली जाईल.

खंडपीठाने तात्पुरत्या उपाययोजनेच्या स्वरूपात म्हटले की, "ज्या ठिकाणी अधिकारी उपलब्ध असतील, तेथे न्यायाधिकरणांनी संबंधित उच्च न्यायालयांकडे प्रतिनियुक्तीसाठी न्यायिक अधिकारी पाठवण्याची विनंती करावी." या प्रकरणामुळे न्यायाधिकरणांमधील रिक्त पदांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, प्रकरणांच्या वाढत्या प्रलंबिततेवरही चिंता व्यक्त केली जात आहे.

## तस्कराच्या मालमत्तेवर कारवाई

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरच्या कठुआ जिल्ह्यातील एका अमली पदार्थ तस्कराची सुमारे १.२५ कोटी रुपये किमतीची स्थावर मालमत्ता पोलिसांनी मंगळवारी एनडीपीएस कायद्याच्या तरतुदींनुसार जप्त केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये हिरानगरमधील चप्पर मोर येथील दुकाने आणि एका ढाब्याचा समावेश असून, ती जिल्ह्यातील चप्पर गावचे रहिवासी प्रकाश चंद यांचा मुलगा सुदेश मेहता यांच्या मालकीची आहे, असे त्यांनी सांगितले.

## सीएनजी दरात पुन्हा वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** संकुचित नैसर्गिक वायू (सीएनजी) दरात प्रति किलो २ रुपयांची वाढ करण्यात आली असून, दोन आठवड्यांपेक्षा कमी कालावधीतील ही चौथी दरसुधारणा ठरली आहे. इंद्रप्रस्थ गॅस लिमिटेड यांच्या माहितीनुसार, सीएनजीचा नवा दर आता ८३.०९ रुपये प्रति किलो झाला आहे.

१५ मेपासून झालेली ही चौथी दरवाढ असून, त्यामुळे सीएनजीच्या दरात एकूण ४ रुपये प्रति किलो वाढ झाली आहे. यापूर्वी सीएनजीच्या दरात १ रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्या वाढीनंतर अवघ्या तीन दिवसांत ही नवी दरसुधारणा करण्यात आली आहे. पश्चिम आशियातील संघर्षामुळे वाढणाऱ्या जागतिक कच्च्या तेलाच्या किमतींशी पंपावरील दर जुळवून घेण्याच्या सरकारी मालकीच्या इंधन कंपन्यांच्या धोरणामुळे सोमवारी पेट्रोल आणि डिझेलच्या दरातही अनुक्रमे २.६१ रुपये आणि २.७१ रुपये प्रति लिटर वाढ करण्यात आली होती. दोन आठवड्यांपेक्षा कमी कालावधीतील हीदेखील चौथी दरवाढ आहे.

ताज्या दरसुधारणेमुळे १५ मेपासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरातील एकूण वाढ जवळपास ७.५ रुपये प्रति लिटरपर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे महागाई वाढण्याची तसेच वाहतूक खर्च वाढून त्याचा परिणाम विविध क्षेत्रांवर होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे.


## चिनाबचे पाणी वळवण्यासाठी २,६२० कोटींचे प्रकल्प

# सिंधू पाणी करारानंतर भारताने उचलले मोठे पाऊल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सिंधू पाणी करार निलंबित करणाऱ्या भारताने आता पाकिस्तानकडे जाणारा पाण्याचा प्रवाह रोखण्यासाठी आणखी एक मोठे धोरणात्मक पाऊल उचलले आहे.

केंद्र सरकार चिनाब नदी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी हिमाचल प्रदेशकडे वळवण्यासाठी सुमारे २,६२० कोटींच्या दोन महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांवर वेगाने काम करत आहे. या निर्णयामुळे पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि दिल्लीसारख्या पाणीटंचाईग्रस्त राज्यांना मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.



त्याचबरोबर हिमाचल प्रदेशात अतिरिक्त ४,००० मेगावॅट जलविद्युत निर्मितीची क्षमता निर्माण होणार आहे.

वृत्तांनुसार, केंद्र सरकारचा मुख्य उद्देश चिनाब नदीची उपनदी असलेल्या चंद्र नदीचे पाणी हिमाचल प्रदेशातील लाहौल खोऱ्यातून बियास नदी प्रणालीकडे वळवणे हा आहे. यासाठी सुमारे ८.७ किलोमीटर लांबीचा बोगदा उभारण्याचा प्रस्ताव आहे. २,३५२ कोटी खर्चाच्या या प्रकल्पामध्ये १९ मीटर उंच धरणाच्या बांधकामाचाही समावेश असेल. या बोगद्यामुळे चिनाब खोऱ्यातील अतिरिक्त पाणी भारताच्या वापरासाठी राखून ठेवता येणार असून कृषी आणि ऊर्जा क्षेत्राला मोठा दिलासा मिळणार आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने स्पष्ट संदेश दिला आहे की दहशतवाद आणि पाणी एकत्र वाहू शकत नाहीत. त्यानंतर जलशक्ती मंत्रालयाने पश्चिमेकडील नद्यांवरील पायाभूत प्रकल्पांना गती दिली आहे. सरकारने भारताच्या वाट्याला आलेल्या पाण्याचा एकही थेंब पाकिस्तानकडे व्यर्थ वाहू न देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. सिंधू, झेलम आणि चिनाब नद्यांचे पाणी आता देशांतर्गत सिंचन, पिण्याचे पाणी आणि ऊर्जा निर्मितीसाठी अधिक प्रभावीपणे वापरण्याची रणनीती आखली जात आहे. या प्रकल्पांमुळे राजस्थान आणि हरियाणासारख्या पाणीटंचाईग्रस्त राज्यांतील सिंचन व्यवस्थेला मोठी मदत मिळणार आहे. कृषी क्षेत्रासाठी अतिरिक्त पाण्याचा मोठा स्रोत उपलब्ध होईल. सिंधू पाणी करार हा १९६० मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात जागतिक बँकेच्या मध्यस्थीने झालेला करार आहे. या करारानुसार रावी, बियास आणि सतलज या पूर्वेकडील नद्यांवरील नियंत्रण भारताला, तर सिंधू, झेलम आणि चिनाब या पश्चिमेकडील नद्यांवरील बहुतांश वापर पाकिस्तानला देण्यात आला होता.